आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३१ जानेवारी २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावं असं राष्ट्रपतींचं आवाहन / राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला प्रारंभ
- स्वातंत्र्यप्राप्तीच्या शतकपूर्तीपर्यंत देश विकसित भारताचा संकल्प पूर्ण करेल, असा प्रधानमंत्र्यांना विश्वास
- तिसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाला पुण्यात प्रारंभ

**आणि**

- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला २५ पदकांची कमाई

**<><><><><>**

देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी महात्मा गांधी आणि सरदार पटेल यांच्यासारख्या थोर नेत्यांनी दिलेली एकतेची शपथ आठवून आणि देश संरक्षणात प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांकडून प्रेरणा घेऊन सर्व नागरिकांनी योगदान द्यावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीला संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करत होत्या.

सरकारनं गेल्या १० वर्षात विकास आणि प्रगतीची नवी शिखरं गाठली आहेत, असं त्या म्हणाल्या. शेतकरी, युवक आणि गरिबांच्या हिताला सरकारनं नेहमीच प्राधान्य दिलं असून मध्यमवर्गीयांची स्वप्न साकार

करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं त्यांनी सांगितलं. तंत्रज्ञानचा अंगिकार करण्यात भारत जगाचा मार्गदर्शक बनला आहे. देशाच्या युपीआय तंत्रज्ञानाच्या यशाचं जगभरात कौतुक होत आहे, असं त्या म्हणाल्या. देशाची अंतराळ विज्ञानातली प्रगती उल्लेखनीय असून लवकरच भारतीय अंतराळवीर गगनयानातून अंतराळात जाईल, असं विश्वास त्यांनी व्यक्त केला. सरकारनं 'इंडिया ए आय' हा कृत्रिम बुद्धिमत्तेला चालना देणारा नवा कार्यक्रम सुरु केला असल्याचं त्यांनी सांगितलं. भारत जैव उत्पादन क्षेत्रात भविष्यातल्या औद्योगिक क्रांतीचा सूत्रधार असेल, असंही त्या म्हणाल्या.

सरकारनं डिजिटल तंत्रज्ञानाला समानता आणि सामाजिक न्यायाचं नवं माध्यम बनवलं आहे असं त्या म्हणाल्या. यातूनच छोट्या गावांपर्यंत बँकिंग आणि युपीआय सारख्या जागतिक दर्जाच्या सेवा उपलब्ध झाल्या आहेत, असं त्यांनी सांगितलं. ई - प्रशासन हे  देखील सरकारचं प्राधान्य क्षेत्र असल्याचं त्यांनी सांगितलं.

महिलांच्या नेतृत्वाखाच्या विकासाला प्रोत्साहन दिलं जात असून महिला आज विविध क्षेत्रात गगनभरारी घेत आहेत, असं राष्ट्रपती म्हणाल्या. आज महिला वैमानिक लढाऊ विमानं चालवत असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख राष्ट्रपतींनी केला. महिलांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवल्या जात असून ३ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे असं त्यांनी सांगितलं.  देशात पायाभूत सुविधा विकास जलद गतीनं सुरु असून त्यासाठी रस्ते बांधणी, रेल्वे मार्ग निर्मिती, मेट्रो अशी विविध कामं सुरु

असल्याचं त्या म्हणाल्या. देशात गेल्या ६ महिन्यात १७ नव्या वंदे भारत रेल्वे सुरु झाल्या तर काश्मीरमध्ये जगातला सर्वात उंच रेल्वे पूल बांधल्याच त्यांनी सांगितलं. देशातल्या विमानतळांची संख्या गेल्या १० वर्षात दुप्पट झाल्याचं त्यांनी सांगितलं. आरोग्य पायाभूत सुविधा आणि वैद्यकीय उपकरणांच्या निर्मितीला चालना देण्यासाठी विविध कार्यक्रम राबवत असल्याचं राष्ट्रपतींनी सांगितल…

आधुनिक आणि आत्मनिर्भर कृषी व्यवस्थेला सरकारनं प्राधान्य दिलं आहे. शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य भाव आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी सरकार निरंतर प्रयत्न करत आहे. सरकारी योजनांचा सर्वाधिक लाभ वंचित, गरीब आणि आदिवासी समुदायाला होत असल्याचं त्या म्हणाल्या .

<><><><><>

देशातल्या मतदारांनी आपल्या सरकारवर तिसऱ्यांदा विश्वास व्यक्त केला असून यावेळचा अर्थसंकल्प या कार्यकाळातला पहिला पूर्ण अर्थसंकल्प आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. दिल्लीमध्ये आज संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु होण्यापूर्वी प्रसारमाध्यमांना ते संबोधित करत होते. भारताने लोकशाही राष्ट्र म्हणून ७५ वर्ष पूर्ण केली असून वर्ष २०४७ मध्ये जेव्हा भारत स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण करेल, तेव्हा देश विकसित भारताचा संकल्प पूर्ण करेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी व्यक्त केला. भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी

संसदेच्या सर्व सदस्यांनी योगदान देण्याचं आवाहनही प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

महिलांच्या योगदानाशिवाय देश समृद्ध होऊ शकत नाही, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत राष्ट्रीय महिला आयोगाच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. देशात प्रथमच लोकसभा आणि विधानसभेमध्ये महिलांना एक तृतीयांश आरक्षण देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. देशातल्या महिला अनेक आव्हानांना सामोऱ्या जात असून त्या युद्ध करण्यासाठी सुरक्षा दलात देखील सहभागी होत आहेत, असं त्यांनी सांगितलं. कामाच्या ठिकाणी आणि इतर जागी महिलांबाबत होत असलेल्या भेदभाव कमी करण्यासाठी महिला आयोगानं काम करावं, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मराठी भाषेला राजमान्यता देण्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांनी केली. याच मराठी भाषेची परंपरा टिकवण्यासाठी आपण या संमेलनाच्या माध्यमातून साद घालत आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पुणे इथे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणात तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या सोहळ्यात प्रसिद्ध मराठी साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक तसंच ९७व्या अखिल भारतीय मराठी

साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. कौशल्य विकास आणि उद्योगजकता विकास मंत्रालयाच्या **सिद्ध** या संकेतस्थळाचं उद्घाटन आणि लोकार्पण यावेळी करण्यात आलं.

पुस्तकं आणि पुस्तकांचे निर्माते यांचा महाकुंभमेळा या संमेलनात भरला असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. तिसरं मराठी विश्व संमेलन पुण्यात झाल्यानंतर आता ते परदेशातही व्हावं, अशी आशा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. कवी केशवसुतांचं जन्मस्थान असलेल्या मालगुंड या गावाला पुढच्या वर्षी पुस्तकांच्या गावाचा दर्जा देण्याची घोषणा मंत्री उदय सामंत यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

नवी दिल्ली मध्ये होणाऱ्या 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी पाठबळ दिलं जाईल**,** असं देवेंद्र फडणवीस यांनी काल दिल्लीत सांगितलं. 21 ते 23 फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या या साहित्य संमेलनासाठी महाराष्ट्र सदनातील कार्यालयाचं उद्घाटन काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दिल्लीत होणाऱ्या या संमेलनाला विशेष महत्व आहे**,** असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

प्रयागराज इथल्या कुंभमेळ्यात नुकत्याच झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेला न्यायालयीन आयोग आज संगम घाटाला भेट देत आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती हर्ष कुमार यांच्या नेतृत्वाखाली हा त्रिसदस्यीय आयोग राज्यसरकारने स्थापन केला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेत झालेल्या भीषण अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबियांचं त्यांनी सांत्वन केलं असून, कठीण काळात आपण अपघातग्रस्तांच्या पाठीशी आहोत असं त्यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत वॉशिंग्टन डीसी इथं काल अपघातग्रस्त झालेल्या विमानाचा ब्लॅकबॉक्स सापडला असून लष्करी हेलिकॉप्टरच्या ब्लॅक बॉक्सचा शोध अद्याप सुरु आहे. रोनाल्ड रीगन विमानतळाजवळ एका प्रवासी विमानाची आणि लष्करी हेलिकॉप्टरची टक्कर होऊन दोन्ही पोटोमॅक नदीत कोसळली.  त्यात ६७ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत असून आतापर्यंत २८ मृतदेह हाती लागले आहेत.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लड यांच्यातल्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज पुण्यात होणार आहे. संध्याकाळी सात वाजता हा सामना सुरू होईल. मालिकेत याआधी झालेल्या तीन सामन्यांपैकी भारतानं दोन तर इंग्लंडनं एका सामन्यात विजय मिळवला आहे. त्यामुळे या सामन्यात विजय मिळवून मालिकेत विजयी आघाडी घेण्याचा भारताचा, तर बरोबरी साधण्याचा इंग्लंडचा प्रयत्न असेल.

**<><><><><>**

उत्तराखंड इथे सुरू असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने आतापर्यंत सर्वाधिक २५ पदकांची कमाई केली आहे. यात ५ सुवर्ण, १२ रौप्य आणि ८ कास्य पदकांचा समावेश आहे. सध्या महाराष्ट्र पदकतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. आज झालेल्या स्पर्धांमध्ये १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात पुरुष गटात महाराष्ट्राच्या पार्थ माने याने सुवर्ण पदक मिळवलं आहे. तर, रौप्य पदकही महाराष्ट्राच्या रुद्रांक्ष पाटील याने मिळवलं आहे. सेना दलाच्या अंकुश जाधव याने या स्पर्धेत कास्य पदक पटकावलं. काल झालेल्या १० मीटर एअर रायफल प्रकाराच्या अंतिम फेरीत महिलांच्या गटात महाराष्ट्राच्या आर्या बोरसे हिने रौप्य पदक पटकावलं.

**//<><><><><>//**